१२५/

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण


९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १२२/प्रनिप्रा/७२०९  दिनांक : 20 MAY 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, **दिनांक १२ एप्रिल, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ४६ व ४७ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य १) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य व २) डॉ. प्रमोद नाईक, प्र. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.व ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक हे काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. गोविंद रेणूकादासराव संगवई, सहाय्यक संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व २) श्री. एन.बी. पाटील, प्रणाली विष्लेषक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | १२/०४/२०२२ | दुपारी १२:०० वा. | तंत्र शिक्षण | एम.बी.ए. / एम.एस.एस. व एम.सी.ए. |
| | | दुपारी ०३:०० वा. | | पदव्युत्तर पदवी हॉटेल मॅनेजमेंट आणि व्यवस्थापन, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी / तंत्रज्ञान, वास्तूशास्त्र, फार्म - डी (पी.बी.) |

तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ७/४/२०२२ व २५/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदव्युत्तर पदवी एम.बी.ए. / एम.एस.एस., एम.सी.ए., हॉटेल मॅनेजमेंट आणि व्यवस्थापन, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी / तंत्रज्ञान, वास्तूशास्त्र व फार्म - डी (पी.बी.) या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितीतील उक्त नमूद अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय अहवाल प्राधिकरणास सादर केला आहे.

तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी व्यावसायिक तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष व्यावसायिक पदव्युत्तर पदवी एम.बी.ए. / एम.एस.एस., एम.सी.ए., हॉटेल मॅनेजमेंट आणि व्यवस्थापन, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी / तंत्रज्ञान, वास्तूशास्त्र व फार्म - डी (पी.बी.) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालाचे बैठकीमध्ये अवलोकन करण्यात आले, तसेच अभ्यासक्रम / महाविद्यालय निहाय प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांची प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४(ड) मधील निर्देशास अनुसरुन निवडक पध्दतीने छाननी करण्यात आली व तद्नंतर सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले,-

१) शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये शासकीय / अशासकीय अनुदानित महाविद्यालये वगळून, इतर सर्व महाविद्यालये/संस्थांकडून "प्रक्रिया शुल्क" वसूल करण्यात यावे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

२) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक प्रथम वर्ष व्यावसायिक पदव्युत्तर पदवी एम.बी.ए. / एम.एस.एस., एम.सी.ए., हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी / तंत्रज्ञान, वास्तूशास्त्र व फार्म - डी (पी.बी.) या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे, अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची तात्पुरती मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | एकुण महाविद्यालये | शासकीय / अनुदानित / अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालये (प्रपत्र-अ) | | अमान्य प्रवेश (प्रपत्र-ब) | | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-क) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महाविद्यालये | प्रवेशित विद्यार्थी | महाविद्यालये | विद्यार्थी | महाविद्यालये | त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेली विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १) | एम.बी.ए. / एम.एस.एस. | ३१७ | ०२ | २१९ | ९३ | ८९०२ | २२२ | ५२६ | ६९ | २६५८९ |
| २) | एम.सी.ए. | ९८ | ०३ | १७० | ३१ | २६९८ | ६४ | ६१ | ०९ | ५५३९ |
| ३) | हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान | ०१ | ०० | ०० | ०१ | ०७ | ०० | ०० | ०० | ०० |
| ४) | औषधनिर्माणशास्त्र | १२३ | ०८ | २४६ | २९ | ८२१ | ८६ | ०३ | ०२ | २७७२ |
| ५) | अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | १८१ | ०८ | ८०५ | ४५ | ४९० | १२८ | १७ | ०८ | २६८९ |
| ६) | वास्तूशास्त्र | १९ | ०० | ०० | १० | १५२ | ०९ | ०० | ०१ | १५९ |
| ७) | फार्म - डी (पी.बी.) | ०३ | ०० | ०० | ०३ | ३० | ०० | ०० | ०० | ०० |
| | एकुण : | ७४२ | २१ | १४४० | २१२ | १३१०० | ५०९ | ६०७ | ८९ | ३७७४८ |

उक्त तालिकेतील अभ्यासक्रम व महाविद्यालय निहाय तपशीलवार माहिती प्रपत्र - 'अ', 'ब' व 'क' मध्ये सोबत जोडलेली आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

तालिकेतील दर्शविलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत,-

१) उक्त तालिकेतील स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेली महाविद्यालये (प्रपत्र-अ) शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयांच्या संदर्भात शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले असल्याने संबंधीत शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

२) उपरोक्त शासनाच्या पत्राच्या अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये शासकीय / अशासकीय अनुदानित, अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालये वगळून इतर सर्व महाविद्यालये / संस्थाकडून (विनाअनुदानित / विद्यापीठ संचलित / विद्यापीठ विभाग) यांनी प्रक्रिया शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे. उक्त स्तंभ क्रमांक ६ मधील ज्या महाविद्यालयांनी प्रक्रिया शुल्काचा भरणा केला नाही, अशा महाविद्यालयांनी लवकरात लवकर "प्रक्रिया शुल्काचा" भरणा करण्याबाबत कळविण्यात यावे. प्रपत्र-ब मधील महाविद्यालयांनी प्रक्रिया शुल्काचा भरणा केल्यानंतर व अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार रितसर प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

३) औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासोबत सादर करण्यात आलेल्या Pharm-D (PB). या अभ्यासक्रमाच्या संस्थांनी स्वतंत्रपणे प्रक्रिया शुल्काचा भरणा करुन रितसर प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या मान्यतेस सादर करावेत. तसे संबंधीत संस्थांना कळविण्यात यावे.

४) पुणे इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पुणे (६६४१) - येथील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयाच्या दिनांक १४/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील खालील अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांवर ATMA, MAT व XAT या सामाईक प्रवेश परीक्षांच्या गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता मिळण्याची विनंती केलेली आहे, प्रवेशाचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

| Sr. No. | Course | Approved Intake | Filled Seats through CAP round | Vacant after CAP and Institutional Quota |
|---|---|---|---|---|
| १. | MBA | १८० | १४८ | ३२ |
| २. | MBA (FinTech) | ६० | १८ | ४२ |
| ३. | MBA (Project Management) | ६० | ०८ | ५२ |
| | Total : | ३०० | १७४ | १२६ |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९/ प्र.क्र.३६३/तांशि-४, दिनांक १६/०३/२०२० मध्ये खालील प्रमाणे शासन निर्णय आहे,-

*"तंत्र शिक्षण संचालकांच्या अहवालाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून राज्यातील मान्यता प्राप्त व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्र पदवी (MBA/MMS) अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता अखिल भारतीय उमेदवारी प्रकारामध्ये GMAT, MAT, ATMA व XAT या परीक्षा ग्राह्य न धरता केवळ MA-MBA/MMS CET, CMAT व CAT या प्रवेश परीक्षा ग्राह्य धरण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे"*

शासन निर्णयानुसार GMAT, MAT, ATMA व XAT या सामाईक प्रवेश परीक्षा MBA/MMS प्रवेशासाठी ग्राह्य नसतानासुध्दा पुणे इंस्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पुणे या संस्थेने या सामाईक परीक्षा दिलेल्या एकूण ४९ विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे दिसून येत आहे. या प्रवेश पद्धतीमुळे महाविद्यालयाने अधिनियम २०१५, मधील तरतुदींचे उल्लंघन केले आहे.

या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संदर्भात संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक १२/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचा तपासणी अहवाल प्राधिकरणास सादर केला. या तपासणी अहवालानुसार ४९ विद्यार्थ्यांच्या मुळ प्रमाणपत्रांची शासन मान्य नियमानुसार पडताळणी केली असता त्यापैकी ३१ विद्यार्थ्यांनी (प्रवेश परीक्षा वगळून ) कागदपत्रांची पुर्तता केल्याचे नमूद केले आहे. उर्वरित १८ विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत. तसेच, महाविद्यालयाने केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत करण्यात आलेल्या एकूण १८७ विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या माहितीसह या ४९ विद्यार्थ्यांची माहिती सादर केलेली नाही. या प्रवेश पद्धतीमुळे प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून प्राधिकरण महाविद्यालयाला रु. १ लाख इतका दंड भरणा करण्याच्या अधीन राहून ३४ विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना मान्यता देत आहेत, तसेच अशा प्रकारची चूक भविष्यात पुन्हा झाल्यास महाविद्यालयाची मान्यता / संलग्नता रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल याची महाविद्यालयांने गांभीर्याने दखल घ्यावी. सदरील मान्यता ही एक वेळची विशेष बाब म्हणुन प्रदान करण्यात येत असल्याने महाविद्यालयाने या निर्णयाचा संदर्भ / आधार भविष्यात घेऊ नये. ही बाब स्पष्ट करण्यात येत आहे.

५) स्तंभ क्रमांक ८ मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयांची अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच, ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहे. या अमान्य प्रवेशांसंदर्भात मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

६) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या तपासणी अहवालात काही विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसाठी शिफारस केली नव्हती, परंतू त्रुटी दर्शविण्यात आली नाही व काही विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यतेसाठी शिफारस होती. परंतू त्यांच्या नावासमोर प्रवेश रद्द असा शेरा होता (प्रपत्र -ड) असे सर्व प्रवेश १% प्रवेश पडताळणी समितीने पुन:श्च पडताळणी करुन त्याचा अहवाल त्वरीत प्राधिकरणास सादर करावा. तद्नंतर या प्रवेशाबाबत मान्यतेचा उचित निर्णय घेण्यात येईल.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणाच्या वरील निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र (प्रपत्र-क नुसार) निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२०-२१ नुसार) कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

निरंक

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी माहिती/अहवाल सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : १६।५।२२